विक्रीकर सहआयुक्त (प्रशिक्षण) यांचे कार्यालय
विक्रीकर भवन, ७वा मजला, जुनी इमारत,
माझगाव, मुंबई-४०००१०

# परिपत्रक

क्र.विउआ(प्रशिक्षण)/आस्था-१८/२०१७-१८/निवृत्ती ओळखपत्र/ब- 517 मुंबई, दिनांक- 06/07/17

विषय- निवृत्ती वेतनधारकांना ओळखपत्र देण्याबाबत

संदर्भ- १) सामान्य प्रशासन विभाग यांचे परिपत्रक क्रमांक- संकीर्ण १०९९/१२२०/१८ (र.व.का.)मंत्रालय दिनांक- २८ जुलै, २०००
२) सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमांक- संकीर्ण २०१६/ प्र. क्र. १८३ / १८ (र.व.का.)मंत्रालय दिनांक- २३ फेब्रुवारी, २०१७
३) सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमांक- संकीर्ण २०१६/ प्र. क्र. १८३ / १८ (र.व.का.)मंत्रालय दिनांक- २३ जून, २०१७

१) महाराष्ट्र शासनाने दि. २८ जुलै २००० च्या शासन परिपत्रकान्वये निवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना सेवानिवृत्तीनंतरची कामे सुलभपणे करून घेण्यासाठी शासकीय अधिकारी / कर्मचारी ज्या पदावरून निवृत्त झाले आहेत ते पद नमूद करून त्यांना सेवानिवृत्तीनंतर एका वर्षाच्या कालवधीसाठी फोटोसह ओळखपत्र देण्यात येते.

२) सदर परिपत्रकात शासनाने दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७ च्या परिपत्रकाद्वारे सुधारणा केली आहे. सुधारित परिपत्रकान्वये निम्नलिखित परिस्थितीमध्ये निवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचा-यांना निवृत्तीनंतरचे कायमस्वरूपी ओळखपत्र देण्यात यावे.

अ. शासकीय अधिकारी / कर्मचारी ज्या पदावरून निवृत्त झाले आहेत ते पद नमूद करून संबंधित प्रशासकीय कार्यालय / विभागाने त्यांना कायमस्वरूपी फोटोसह ओळखपत्र देण्याची कार्यवाही करावी.

ब. पदनाम नमूद करताना त्याआधी **सेवानिवृत्त** असा उल्लेख न चुकता करावा.

क. सदर ओळखपत्र देण्यापूर्वी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी शासन सेवेत असतानाचे ओळखपत्र शासनाकडे जमा केलेले आहे याची खातरजमा करावी.

३) महाराष्ट्र शासनाने दिनांक २३ जून, २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी ओळखपत्राचा नमुना विहीत करण्यात आलेला आहे. नमुना परिपत्रकासोबत जोडण्यात आलेला आहे. तसेच ओळखपत्र निर्गमित करण्यापूर्वी ओळखपत्राच्या मागील बाजूस महाराष्ट्र शासनाच्या गोल शिक्क्याची मोहोर उमटवावी.

शासकीय अधिकारी / कर्मचारी ज्या विभागातुन निवृत्त झाले त्या संबंधित प्रशासकीय विभागाने / आस्थापनेने त्यांना ओळखपत्र देण्याची कार्यवाही करावी. तसेच या नंतर देखिल शासकीय अधिकारी / कर्मचारी ज्या आस्थापनेतुन निवृत्त झाले त्या आस्थापनेने वरिल नियमांचे पालन करून निवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना कायमस्वरूपी ओळखपत्र देण्याची कार्यवाही करावी. तसेच या प्रयोजनासाठी येणारा खर्च प्रशासकीय विभागांनी मंजूर अनुदानातून भागवावा.

उपरोक्त मुद्दे प्रशासन सहआयुक्तांनी / कार्यालय प्रमुखांनी त्यांचे विभागातील कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून, त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

( मा. विशेष विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने )

**विक्रीकर सहआयुक्त (प्रशिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबइ**

प्रत सादर-

१) मा. विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत-

२) सर्व अपर विक्रीकर आयुक्त
३) सर्व विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन)
४) सर्व विक्रीकर उपआयुक्त (प्रशासन)
५) विक्रीकर उपआयुक्त (जनसंपर्क)
६) सर्व सहाय्यक विक्रीकर आयुक्त (प्रशासन)
७) सर्व आस्थापना अधिकारी
८) प्रबंधक, महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण, मुंबई
९) विक्रीकर अधिकारी, लेखन सामुग्री विभाग, मुंबई यांना कळविण्यात येते की सर्व आस्थापनेला / विभागाला आपल्या कार्यालयामार्फत कोरी ओळखपत्रे पुरविण्यात यावीत.

## महाराष्ट्र शासन

### सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे ओळखपत्र

AADHAAR

ज्या विभाग / कार्यालयातून सेवानिवृत्त झाले त्याचे नाव व पत्ता :

दूरध्वनी क्रमांक :

छायाचित्र

नाव :

सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद :

सेवानिवृत्तीचा दिनांक :

आधार क्रमांक :

ओळखपत्र क्रमांक :

ओळखपत्र धारकाची स्वाक्षरी    ओळखपत्र देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व स्वाक्षरी

---

रक्तगट :

विशेष आजार :

भ्रमणध्वनी / दूरध्वनी क्रमांक :

निवासी पत्ता :

1. हे ओळखपत्र अहस्तांतरणीय आहे.
2. हे ओळखपत्र सापडल्यास ओळखपत्र देणाऱ्या कार्यालयाकडे परत पाठवावे.